# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

माहितीचा अधिकार

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : १२२४/२०२२**

| **अपिलार्थी** | **प्रतिवादी** | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** | **प्रथम अपिलीय अधिकारी** |
| श्री. संजय शालीकरामजी चामाटे, घर क्र. २२६, वार्ड क्र. १२, धनगरपुरा, हिंगणा ता. हिंगणा जि. नागपूर-४४१११० | निरिक्षक, नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, लोटस प्लॉझा, व्ही.सी.ए. स्टेडियमचे समोर, सिव्हील लाईन, नागपूर | सचिव, नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, लोटस प्लॉझा, व्ही.सी.ए. स्टेडियमचे समोर, सिव्हील लाईन, नागपूर |

**सुनावणी दिनांक :- १२.११.२०२४**

**१. उपस्थिती –**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| **उपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** |

**२. व्दितीय अपील अर्ज –**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : ०५.०५.२०२२

(२) व्दितीय अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०५.०५.२०२२

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : प्रथम अपील हेतुपुरस्पर फेटाळण्यात आल्यामुळे.

(४)व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : सन २००९ साली सुरक्षा रक्षकांच्या झालेल्या भरती प्रक्रियेतील प्रतिक्षा यादीवर असणाऱ्या सुरक्षा रक्षकांची गुणांसहीत यादी मिळण्याची विनंती केलेली आहे.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : ०१.१२.२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०१.१२.२०२१

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : सन २००९ पासून आतापर्यंत

(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : २००९ साली भरती प्रक्रियेतील प्रतिक्षा यादीवर असलेल्या सुरक्षा रक्षकांना अजूनही नोकरी न मिळाल्यामुळे त्यांच्या गुणांची तपासणी करणेबाबत.

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : दिनांक २४.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यां दिनांक ०१.१२.२०२१ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज सादर करुन सुरक्षा रक्षकाची प्रतिक्षा यादी मिळणेबाबत २००९ पासून आतापर्यंत यादी मागितली असून योग्य वापर होणार नाही, अशा

आशयाचे दोन संघटनांनी मंडळास पत्र देवून आक्षेप नोंदविला आहे. सदर आक्षेपाची छायाप्रत आपल्या सुलभ संदर्भाकरीता व माहितीकरीता संलग्न करण्यात येत आहे. तसेच सबब त्रयस्थ पक्षाची माहिती आपणास दिल्यामुळे प्रतिक्षा यादीवर असलेल्या सुरक्षा रक्षकास हानी होईल असा आक्षेप असल्याने ती देण्याबाबत सुरक्षिततेच्या कारणावरुन कलम ८(१)(ग) अन्वये नाकारण्यात येत आहे, असे अपिलार्थीस कळविले आहे.

**४. प्रथम अपील –**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : १३.०१.२०२२

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १३.०१.२०२२

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती पुरविण्यास असमर्थता दर्शविण्यात आली आहे.

(४) अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : दिनांक २४.०१.२०२२ रोजी सुनावणी घेवून दिनांक १०.०२.२०२२ अन्वये, नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाला माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी लागू होत नाही, त्याआधारे अपिलकर्त्याचे प्रथम अपील फेटाळण्यात येत आहे, असा आदेश पारीत केला आहे.

**५. युक्तीवाद/लेखी खुलासा –**

१. आज सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून त्यांनी नमूद केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने विहीत मुदतीत दिनांक २४.१२.२०२१ रोजी प्रतिसाद दिलेला असून त्यात कलम ८(१)(ग) नुसार माहिती नाकारण्यात आलेली आहे. तसेच प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १०.०२.२०२२ अन्वये नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाला माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी लागू होत नसल्याने अपिलकर्त्याचे प्रथम अपील फेटाळलेले आहे.

२. आज सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित असून त्यांनी नमूद केले की, आता माहितीची आवश्यकता नसून सदर अपील अर्ज निकाली काढावा, अशी आयोगासमोर विनंती केलेली आहे.

**६. निष्कर्ष –**

अपिलार्थी यांनी आयोगासमोर केलेल्या मौखिक निवेदनाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहेत.

**आदेश**

**प्रस्तुतचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.**

(राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर – सत्यमेव जयते)

**(भुपेंद्र गुरव)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १२.११.२०२४**

जावक क्रमांक 177 दिनांक 10 JAN 2025



राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर